# सामुदायिक विज्ञान महाविद्यालय वनामकृवि, परभणी
## प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा
## इ.स. २०२२-२०२३

जा.क्र: सा/विम/237/2022

दिनांक: १६.०६.२०२२

## जाहिरात

सामुदायिक विज्ञान महाविद्यालय,वनामकृवि,परभणी अंतर्गत असणाऱ्या मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभागातील इलएचटी प्रकल्पाअंतर्गत प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेकरीता कंत्राटी सेवा आधारे तात्पुरती नियुक्ती करण्याकरीता खालील पदांसाठी **दि.२१ जून २०२२ रोजी दुपारी २.००** वाजता थेट मुलाखती आयोजीत केल्या आहेत.

या मुलाखतीसाठी उपस्थित राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी त्याच दिवशी **सकाळी ९.३० ते ११.३० वाजेपर्यंत** सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध असलेल्या अर्जामध्ये सुवाच्च अक्षरात संपूर्ण माहिती भरुन तथा त्यास आवश्यक असणारी साक्षांकित प्रमाणपत्रे जोडून तो अर्ज उपरोक्त कार्यालयात सादर करावा. तद्नंतर या अर्जासोबत जोडलेल्या साक्षांकित प्रमाणपत्रांची छाननी त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसोबत करण्यात येऊन त्याआधारे उमेदवारांची मुलाखतीसाठी पात्रता ठरवण्यात येईल. मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांची यादी **दि.२२ जून २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत जाहीर करण्यात येईल.** या पदांवर निवड करण्यात आलेले उमेदवार सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्या आदेशावरुन विभाग प्रमुख, मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग यांच्या अधिनिस्त कार्यरत असतील.

**इ.स. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेकरीता कंत्राटी सेवा आधारे तात्पुरती नियुक्ती करावयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या तथा त्यांचे कंत्राटी सेवा वेतन**

| अ. क्र. | विविध पदांचा तपशील | पद संख्या | करार तत्वावर तात्पूरत्या स्वरुपातील कंत्राटी सेवा वेतन (रु.) /महिना | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षक | ६ | १२,००० | प्राधान्याने सामुदायिक/गृह विज्ञान शाखा पदवीधर अथवा इतर शाखेतील पदवीधर तसेच बालकांची काळजी व शिक्षण यासंबंधी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना प्राधान्य | नव्याने प्रस्तावित पद |
| २ | शिक्षक (अर्धवेळ) | १ | ६००० | प्राधान्याने सामुदायिक/गृह विज्ञान शाखा पदवीधर अथवा इतर शाखेतील पदवीधर तसेच विशेष बालकांची काळजी व शिक्षण यासंबंधी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना प्राधान्य | नव्याने प्रस्तावित पद |
| ३ | मदतनीस | ५ | १०,००० | १० वी उत्तीर्ण, बालकांना हाताळण्याचा अनुभव | नव्याने प्रस्तावित पद |
| ४ | मदतनीस (अर्धवेळ) | ४ | ५००० | १० वी उत्तीर्ण, बालकांना हाताळण्याचा अनुभव | नव्याने प्रस्तावित पद |
| ५ | संगणक चालक | १ | १२,००० | इंग्रजी (४०) व मराठी (४०) टंकलेखन तथा दैनंदिन कार्यालयीन संगणकीय कार्याची कौशल्ये | नव्याने प्रस्तावित पद |

**उमेदवारांनी त्यांच्या संबंधीत असलेली खालील कागदपत्रे तथा पासपोर्ट फोटो अर्जासोबत जोडणे आवश्यक असून या सर्व बाबी अर्जासोबत जोडलेल्या आहेत याविषयी त्यांनी स्वतः खात्री करुन घ्यावी.**

१. इ. १० वी गुणपत्रक व प्रमाणपत्र
२. इ. १२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्र
३. पदवी परीक्षा गुणपत्रक (सर्व वर्षांचे)
४. पदव्युत्तर परीक्षा गुणपत्रक (सर्व वर्षांचे)
५. बालशिक्षणासंबंधी घेतलेल्या प्रशिक्षणाची प्रमाणपत्रे
६. कार्यानुभव प्रमाणपत्र
७. संगणक/टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
८. चित्रकला/नृत्य/संगीत आदी कलासंबंधी परीक्षांचे प्रमाणपत्र
९. डी एड/बी.एड प्रमाणपत्र
१०. विद्यापीठ प्रकल्पग्रस्त असल्यास त्याचे प्रमाणपत्र
११. माजी सैनिक पाल्य असल्यास त्याचे प्रमाणपत्र, इत्यादी.

**थेट मुलाखतीचे नियम व अटी**

- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेसाठी करार तत्वावर कंत्राटी सेवा आधार नियुक्त करावयाची पदे ही संपूर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून उपरोक्त पदांवर निवड केलेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथे कायमस्वरुपी करण्याचा अथवा ज्येष्ठता मिळविण्याचा हक्क नसेल.
- उपरोक्त पदावर कार्य करण्यासाठी इच्छुक उमेदवारांचे शारीरिक तथा मानसिक स्वास्थ्य उत्तम असणे आवश्यक असून त्यांना कोणताही संसर्गजन्य आजार नसावा. याबरोबरच त्यांना बालकांविषयी प्रेम व जिव्हाळा असण्याबरोबरच बालविकासाची तळमळ असावी.
- निवड झालेल्या उमेदवाराच्या सेवा समाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेस त्यांच्या सेवांची आवश्यकता असेपर्यंत त्या चालू ठेवण्यात येतील. तथापी उमेदवाराच्या सेवा समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारास कोणत्याही सबबी न दाखवता कामावरुन कमी करण्याचा हक्क मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग प्रमुख यांच्या तक्रारीवरुन सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्या, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
- निवड झालेल्या उमेदवारास संबंधीत पदावर रुजू होतांना रु.१०० च्या बंधपत्रावर या शाळेच्या नियम व अटीची मान्यता दयावी लागेल व त्या अटींची पुर्तता करणे त्यांच्यासाठी बंधनकारक असेल.
- नियुक्त केलेल्या उमेदवारास मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग प्रमुख, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्या अधिनिस्त प्रत्यक्ष कार्य करावे लागेल.
- मुलाखतीसाठी उपस्थित राहाणाऱ्या उमेदवारांना प्रवास व दैनंदिन भत्ता अनुज्ञेय नसेल.
- या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या संख्येत बदल करण्याचा अधिकार विभाग प्रमुख मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग, यांच्या मागणीनुसार सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्या, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांना असेल.

## विशेष सूचना

मुलाखत प्रभावी होण्यासाठी मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभागाने प्रकाशित केलेल्या बाल विकास व शिक्षण या विषयीच्या खालील पुस्तकांचा लाभ उमेदवारांना घेता येईल. ही सर्व पुस्तके मानव विकास विभागात उपलब्ध आहेत. तसेच उमेदवाराने मुलाखती दरम्यान पूर्व प्राथमिक शिक्षणाशी निगडीत कार्यांचे प्रात्यक्षिक (गाणे, गोष्टी, खेळ, नृत्य, कला इ.) करून दाखवण्याच्या तयारीने यावे.

| अ.क्र. | पुस्तके | किंमत |
|---|---|---|
| १ | प्रभावी बालशिक्षण | ६० |
| २ | बालकांची काळजी आणि विकास | २५ |
| ३ | बालकांच्या कुटुंबातील उत्तेजनात्मक-विकासात्मक वातावरणाची पडताळणी इन्व्हेंटरी | २० |
| ४ | चला खेळ खेळुया, बालकांचा विकास साधुया.. | २५ |
| ५ | वाचन अधिक, लेखन कमी दर्जेदार बालशिक्षणाची हमी | २५ |

मानव विकास व कौटुंबिक अभ्यास, विभाग प्रमुख
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी

डॉ. जया बंगाळे
सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्या
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी